नि.फौ.के.नं. ७४/२०१७

नि. क्र. ५०

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब**

नाव – अशोक पांडुरंग कांबळे,

वय– ५२ वर्षे, व्यवसाय – शेती , रा. चाफवली, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे –**

१. माझ्या घरी माझी पत्नी आणि आई असतात. माझी दोन मूले शिक्षणाकरता मुंबईत आहेत. सन २०१६ मध्ये माझ्या ओळखीचे राजेंद्र गंगाराम मोहीते यांनी मला माझ्या ब–याच ओळखी आहेत. मी तुमच्या मुलांना नोकरीला लावतो. तुमच्या एका मुलाला पोलिस मध्ये व एका मुलाला तहसिलदार कार्यालयात नोकरीला लावतो असे मला बोलले. माझ्या मुलांना नोकरीची गरज असल्याने मी आर.डी.सी.सी.बॅंके शाखा करंजारी येथे घरातील दागीने गहाण ठेवून काही रक्क्म जमा केली. मी माझे साडू प्रकाश कांबळे, रा. उफळे, ता. राजापूर यांच्याकडून रक्क्म रु. ५०,०००/– हात उसने घेतले. मी माझे मित्र श्रीधर सिताराम जाधव, रा. पांगरी, राजापुर यांच्याकडून रक्क्म रु. ५०,०००/– हातउसने घेतले. माझा पुतण्या राजेंद्र गणपत कांबळे यांच्या कडून रक्क्म रु. ५०,०००/– मी हात उसने घेतले. मी दि. १३/०२/२०१६ रोजी राजेंद्र गंगाराम मोहीते यांना त्यांच्या घरी जाऊन रक्कम रु. १,४५,०००/– दिले. त्यानंतर एप्रिल महीन्यात रक्कम रु. १,००,०००/– इतकी रक्कम मी आरोपीला रत्नागिरी कुआरबाव येथे दिली. मे २०१६ रोजी मी आरोपीला सह्याद्री नगर देवरुख येथे रक्क्म रु. ५०,०००/– दिले. मे २०१६

मध्ये मौजे पाली येथे आरोपीला मी रु. ५०,०००/– दिले. जून २०१६ मध्ये आरोपीला मी देवळे येथे रक्क्म रु. १,००,०००/– दिले. जून २०१६ मध्ये उर्वरीत ५५,०००/– रक्क्म मी आरोपीच्या घरी जाऊन मी त्यांना दिले. आरोपीला मी एकूण ५,००,०००/– रु. टप्प्याटप्याने दिले. त्यानंतर माझ्या मुलांना नोकरीला लावले नसल्याने आरोपीने आजतागायत एकही रुपया माघारी दिला नाही. आरोपीने मला दि. १८/१०/२०१६ रोजी रक्कम रु. ४,००,०००/– चा चेक दिला. मला तो चेक दाखवल्यास मी ओळखु शकतो. (मौल्यवान मुद्देमाल जप्त असल्याने व कार्यालयीन सुट्टी असल्याने आजरोजी तो न्यायालयात दाखल करता येत नाही.)

२. मी पुन्हा आरोपीच्या घरी गेलो आणि माझे पाच लाख रुपये परत देण्याचे सांगीतले. दि. २३/०२/२०१७ रोजी आरोपीने मला एक नोटराइझ करारपत्र लिहून दिले. मला दिलेला चेक दि. २६/१०/२०१६ रोजी बाऊंस झाला होता. (मौल्यवान मुद्देमाल जप्त असल्याने व कार्यालयीन सुट्टी असल्याने आजरोजी तो न्यायालयात दाखल करता येत नाही.) चेक बाऊंस झाल्यानंतर मी आरोपीच्या घरी जाऊन विचारण्या केली असता आरोपी माझ्या अंगावर धाऊन आला व शीवीगाळ, दमदाटी केली. आरोपीने मला दि. २३/०२/२०१६ पर्यंत साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, दि. २३/०२/२०१७ पर्यंत पैसे माघारी परत देण्याबाबत करारपत्र आणि वचनचिठ्ठी करुन दिली. ते करारपत्र नोटरी वकील अॅड. गिडये यांच्या समक्ष केले. त्यावेळी आरोपी समक्ष होते. यावेळी साक्षीदार प्रदिप सखाराम कांबळे हजर होते. मला ते करारपत्र दाखवल्यास मी ओळखु शकतो. सदरचा दस्त दि. २३/०१/२०१७ रोजी करण्यात आला होता. मला आता दाखवलेले करारपत्र तेच

आहे. त्यावर माझी आणि आरोपीची सही, आमचे फोटो आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. **करारपत्राला पुढील नि.५१** देण्यात येते. (करारपत्र जप्त मुद्देमाल २४/२०२० येथे आहे.) वचनचिठ्ठीमध्ये आरोपीने मला दि. २३/०१/२०१७ पर्यंत पुर्ण रक्कम देण्याचे मान्य केले होते. (मौल्यवान मुद्देमाल जप्त असल्याने व कार्यालयीन सुटी असल्याने आजरोजी तो न्यायालयात दाखल करता येत नाही.)

**सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.01 17:43:26 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**
**न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**

**दिनांक– ०१/०७/२०२३**